# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांकः14.11.2024** **वारःगुरुवार**

---

१.झारखंड विधानसभा निवडणुकीच्या पहिल्या टप्प्यात ६६ टक्के मतदान; 10 राज्यांमधल्या 31 विधानसभा मतदारसंघात आणि केरळमधल्या वायनाड लोकसभा मतदारसंघात पोटनिवडणुकीसाठी काल मतदान.

२.कालबाहय कायद्यांतर्गत केलेल्या सहा मुख्य संसदीय सचिवांच्या नियुक्त्या हिमाचल प्रदेश उच्च न्यायालयाकडून रद्द; .

३.४३ वा भारतीय आंतरराष्ट्रीय व्यापार मेळावा आजपासून नवी दिल्लीत सुरू.

४.ब्रिटीश लेखिका सॅमंथा हार्वे यांना ‘ऑर्बिटल’ या कादंबरीसाठी 2024 चा बुकर पुरस्कार जाहीर
आणि
५.टी-ट्वेंटी क्रिकेट मालिकेत दक्षिण आफ्रिकेविरुद्ध भारताची 2-1 अशी आघाडी

**झारखंड**

विधानसभा निवडणुकीच्या पहिल्या टप्प्यात झारखंडमध्ये 15 जिल्ह्यांतल्या 43 मतदारसंघांमध्ये काल शांततेत मतदान पूर्ण झालं. संध्याकाळी ५ वाजेपर्यंत जवळपास ६६ टक्के मतदानाची नोंद झाली असून सर्वाधिक म्हणजे 77 टक्क्यांपेक्षा जास्त मतदान खरसावन इथे नोंदवलं गेलं. दुर्गम भागातून अद्याप आकडेवारी यायची असून त्यानंतर ही टक्केवारी वाढण्याची शक्यता असल्याचं मुख्य निवडणूक अधिकारी के रविकुमार यांनी सांगितलं. काल 683 उमेदवारांचं राजकीय भवितव्य मतपेटीत बंद झालं. सरायकेलामधून भाजपचे माजी मुख्यमंत्री चंपाई सोरेन, रांचीमधून राज्यसभा खासदार आणि झामुमोचे उमेदवार महुआ माजी, लोहरदगामधून काँग्रेसचे रामेश्वर ओराव, जमशेदपूर (पश्चिम) मधून जनता दल (युनायटेड)चे सरयू राय तसंच, इचागढ मधून AJSU चे हरे लाल महतो अशा महत्त्वाच्या उमेदवारांचं भवितव्य या निवडणुकीत ठरणार आहे. २० नोव्हेंबर रोजी दुसऱ्या टप्प्यातील मतदान होणार असून २३ नोव्हेंबर रोजी मतमोजणी होणार आहे.

**पोट**

10 राज्यांमधील 31 विधानसभा मतदारसंघ आणि केरळमधील वायनाड लोकसभा मतदारसंघातील पोटनिवडणुकीसाठीही काल मतदान झालं. यामध्ये राजस्थानमधील सात, पश्चिम बंगालमधील सहा, आसाममधील पाच, बिहारमधील चार, कर्नाटकातील तीन आणि मध्य प्रदेशातील दोन जागांचा समावेश आहे. याशिवाय केरळ, छत्तीसगड, गुजरात आणि मेघालयमध्ये विधानसभेच्या प्रत्येकी एका जागेसाठी काल पोटनिवडणुक झाली. केरळच्या वायनाड लोकसभा मतदारसंघासाठी झालेल्या पोटनिवडणुकीत जवळपास 65 टक्के मतदान झालं.

**प्रचार**

झारखंडमधील विधानसभा निवडणुकीच्या दुसऱ्या टप्प्यातल्या आणि महाराष्ट्रातल्या एकाच टप्प्यातील मतदानासाठी निवडणुकीची रणधुमाळी अधिक तीव्र झाली आहे. आपल्या उमेदवारांच्या प्रचारासाठी विविध राजकीय पक्षांच्या प्रमुख नेत्यांनी कंबर कसल्याचं चित्र आहे.

**प्रचार**

महाराष्ट्रात विधानसभा निवडणूकीच्या प्रचाराचे आता शेवटचे काही दिवस शिल्लक राहिले असून सर्व राजकीय पक्षाच्या नेत्यांनी प्रचाराचा धडाका लावला आहे. स्थानिक नेते - पदयात्रा, प्रचार फेऱ्या, गृहभेटी अशा विविध माध्यमातून मतदारांपर्यंत पोहोचण्याचा प्रयत्न करत आहेत. तर उमेदवारांच्या प्रचारासाठी आलेल्या वरिष्ठ नेत्यांमध्ये, आरोप प्रत्यारोपांच्या फैरी झडताना दिसून येत आहेत. –x--

**सन्या**

कार्यकारी मंडळ कोणा व्यक्तींची मालमत्ता पाडून त्यांचे अपराध ठरवण्यासाठी न्यायपालिका म्हणून काम करू शकत नाही असा निर्णय सर्वोच्च न्यायालयानं दिला आहे. आरोपी व्यक्तींविरुद्ध अधिकाऱ्यांनी बुलडोझर चालवण्याच्या कारवाईला आव्हान देणाऱ्या याचिकांवर न्यायालयानं काल हा महत्त्वपूर्ण निर्णय दिला. योग्य अधिकाराशिवाय कोणतंही पाडकाम हे अनियंत्रित मानलं जाईल असंही न्यायालयानं नमूद केलं आहे.

**संसदीय-सचिव**

कालबाह्य कायद्यांतर्गत केलेल्या सहा मुख्य संसदीय सचिवांच्या नियुक्त्या हिमाचल प्रदेश उच्च न्यायालयाकडून काल रद्द करण्यात आल्या. न्यायमूर्ती विवेक ठाकूर आणि बी सी नेगी यांचा समावेश असलेल्या उच्च न्यायालयाच्या खंडपीठानं या सचिवांच्या सर्व सुविधा आणि विशेषाधिकार, त्वरित प्रभावानं काढून घेण्याचे निर्देशही दिले आहेत.

**मोदी-दौरा**

पंतप्रधान नरेंद्र मोदी शनिवारपासून नायजेरिया, ब्राझील आणि गयानाच्या सहा दिवसांच्या दौऱ्यावर जाणार असल्याची माहिती परराष्ट्र सचिव विक्रम मिसरी यांनी काल नवी दिल्लीत माध्यमांना दिली. 19व्या जी वीस शिखर परिषदेत सहभागी होण्यासाठी मोदी या महिन्याच्या 18 आणि 19 तारखेला ब्राझीलला भेट देणार असून त्यांचा हा तिसरा अधिकृत ब्राझील दौरा आहे.

**कुलगामसामना**

जम्मू आणि काश्मीरमध्ये, कुलगाम जिल्ह्यातील सुधसोना बेहिबाग या परिसरात सुरक्षा दलांनी आज पहाटेपासून नाकाबंदी आणि शोध मोहीम पुन्हा सुरू केली आहे. काल दुपारी या भागात दहशतवादी आणि सुरक्षा दलांमध्ये चकमक झाली होती. पोलीस सूत्रांनुसार, परिसरात अडकलेल्या दहशतवाद्यांना पळून जाता येऊ नये यासाठी अतिरिक्त कुमक मागवण्यात आली असून नाकाबंदी अधिक कडक करण्यात आली आहे. अद्याप कोणतीही जीवितहानी झाल्याचं वृत्त आलेलं नाही.

**व्यापार-मेळा**

४३ वा भारतीय आंतरराष्ट्रीय व्यापार मेळावा आज नवी दिल्लीतील भारत मंडपम इथे सुरू होत आहे. '2047 मधील विकसित भारत' ही यंदाच्या मेळाव्याची संकल्पना आहे. यंदा झारखंड राज्यावर विशेष लक्ष केंद्रित करण्यात आलं असून बिहार आणि उत्तर प्रदेश राज्य, ही भागीदार राज्य आहेत. या बहुप्रतिक्षित आंतरराष्ट्रीय मेळाव्यात चीन, इजिप्त, इराण, दक्षिण कोरिया, थायलंड, तुर्की आणि UAE सह विविध देश सहभागी होत आहेत. 18 तारखेपर्यंत पहिले पाच दिवस व्यावसायिक व्यापारासाठी मेळावा खुला राहणार असून त्यानंतर 27 नोव्हेंबरपर्यंत तो सर्वसामान्यांसाठी खुला असेल.

**बुकर**

ब्रिटीश लेखिका सॅमंथा हार्वे यांना 'ऑर्बिटल' या कादंबरीसाठी 2024 चा बुकर पुरस्कार जाहीर झाला आहे. अंतराळावर आधारित त्यांच्या या पहिल्या पुस्तकासाठी हा पुरस्कार दिला जात आहे . ऑर्बिटल या कादंबरीतून आंतरराष्ट्रीय अवकाश स्थानकावर असलेल्या अंतराळवीरांच्या चमूची कथा एका वेगळ्या दृष्टिकोनातून जगापुढे मांडण्यात आली आहे. ऑर्बिटल हे ब्रिटनमधील सर्वात जास्त विकलं जाणारं पुस्तक असून गतविजेत्या तीन बुकर पुरस्कार विजेत्या पुस्तकांच्या एकत्रित पुस्तक विक्रीलाही त्यानं मागं टाकलं आहे.

**गुटेरस**

आगाऊ इशारा प्रणालीद्वारे अति उष्णतेचं व्यवस्थापन करण्याचं आवाहन संयुक्त राष्ट्रांचे सरचिटणीस अँटोनियो गुटेरेस यांनी काल COP-29 परिषदेत सर्व राष्ट्रांना केलं आहे. अझरबैजानची राजधानी बाकू इथे जागतिक नेत्यांना संबोधित करताना 2024 हे इतिहासातील सर्वात उष्ण वर्ष ठरणार असल्याचं त्यांनी सांगितलं. आगाऊ इशारा प्रणालीमुळे दहा पट परतावा मिळतो तसंच अत्यंत जास्त उष्णतेला प्रतिसाद देणारे व्यावसायिक सुरक्षा उपाय वर्षाला 360 अब्ज डॉलर्सची बचत करु शकतात. या मूलभूत संरक्षणापासून कोणीही वंचित राहू नये याची खात्री करण्यासाठी संयुक्त राष्ट्र कार्य करत असल्याचं ते म्हणाले.

**संयुक्तराष्ट्र**

संयुक्त राष्ट्रांचे सरचिटणीस अँटोनियो गुटेरेस यांनी मेक्सिकोचे मेजर जनरल रॅमन गार्डोडो सांचेझ यांची काश्मीरमधील संयुक्त राष्ट्र निरीक्षक संघटनेचे प्रमुख म्हणून नियुक्ती केली आहे. गार्डोडो अर्जेंटिनाचे रिअर ॲडमिरल गिलेर्मो रिओस मिशनचे प्रमुख आणि भारत आणि पाकिस्तान मधील UN मिलिटरी ऑब्झर्व्हर ग्रुप चे मुख्य लष्करी निरीक्षक म्हणून काम करतील.

**<u>जागतिक मधुमेहदिवस</u>**

जगभरातील लाखो लोकांवर परिणाम करणाऱ्या आणि सार्वजनिक आरोग्यासाठी आव्हान असलेल्या मधुमेहाबद्दल जागरूकता निर्माण करण्याच्या उद्देशाने, आज जागतिक मधुमेह दिन साजरा केला जात आहे. दरवर्षी, हा दिवस - मधुमेह प्रतिबंध, लवकर निदान, प्रभावी व्यवस्थापन आणि सर्वांसाठी उपचारांच्या सहज उपलबद्धतेची गरज अधोरेखित करण्यासाठी पाळला जातो.

2023 मधील इंडियन कौन्सिल ऑफ मेडिकल रिसर्च (ICMR) च्या अभ्यासानुसार, भारतात मधुमेहाचा प्रसार १० कोटींच्या पेक्षा जास्त लोकांमध्ये आहे.

**<u>वितरणबैठक</u>**

केंद्रीय ऊर्जा, गृहनिर्माण आणि शहरी व्यवहार मंत्री मनोहर लाल आज लखनौ इथे 8 व्या वितरण उपयुक्तता संमेलन 2024 मध्ये प्रमुख पाहुणे असतील. कार्यक्रमाचं उद्घाटन मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांच्या हस्ते होणार आहे. दोन दिवस चालणाऱ्या या कार्यक्रमात ऊर्जा आणि वीज क्षेत्रातील नवकल्पनांवर चर्चा होणार आहे.

**<u>क्रिकेट</u>**

भारत आणि दक्षिण आफ्रिका दरम्यान तिसरा टी ट्वेन्टी क्रिकेट सामना भारतानं 11 धावांनी जिंकला. या विजयामुळे चार सामन्यांच्या मालिकेत भारतानं 2-1 अशी आघाडी घेतली आहे. प्रथम फलंदाजी करताना भारतानं तिलक वर्माच्या नाबाद शतकाच्या आणि अभिषेक शर्माच्या अर्धशतकाच्या जोरावर दक्षिण आफ्रिकेला जिंकण्यासाठी 220 धावांचं उद्दिष्ट दिलं. दक्षिण आफ्रिकेचा डाव 208 धावांवर संपुष्टात आला.

मार्को यानसेन याच्या तडाखेबंद 17 चेंडूतील 54 धावांमुळे भारतीय गोटात चिंतेचं वातावरण निर्माण झालं होतं. मात्र तो बाद झाल्यावर भारताचा विजय सुकर झाला. मालिकेतील चौथा आणि अंतिम सामना उद्याच खेळला जाणार आहे.

# याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं. नमस्कार.